समता चॅरीटेबल ट्रस्टचे मुखपत्र.

# समता वार्ता

मासिक

| वर्ष दुसरे – अंक तिसरा | जानेवारी २०१५ | **संपादक–** ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे | पृष्ठे ४ | किंमत ५ रु.

## स्वच्छ भारत उपक्रमांअतर्गत समता इंटरनॅशनल स्कूल व समता पतसंस्थांद्वारा गोदावरी स्वच्छता अभियान संपन्न

कोपरगांव – पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती निमित्त देशभर स्वच्छता अभियान राबविण्याचे आवाहन केल्याने समस्त देशवासियांनाही स्वच्छतेचा वसा घेणे गरजेचे आहे. स्वच्छता हे आपले आद्य कर्तव्य आहे हे कर्तव्य समता परिवार स्वच्छता अभियानात सक्रीय सहभाग नोंदवून पार पाडत आहे. या अभियानाअंतर्गत समता इटरनॅशनल स्कूल व समता पतसंस्थांद्वारा सोमवार दि. २२ रोजी गोदावरी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानाअंतर्गत के.जे.सोमैय्या महाविद्यालयासमोरील गोदावरी पात्राची स्वच्छता करण्यात आली. **स्वच्छता अभियान है। भारत की पहचान।** या समूहगीताने अभियानास प्रारंभ झाला, समता परिवाराचे संस्थापक श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, संचालक श्री.मोहनशेठ झंवर, समता पतसंस्थेचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड साहेब, शहरातील मान्यवर श्री.चंद्रकांत आढाव, समता स्कूलच्या मॅनेजिंग ट्रस्टी सौ.स्वाती संदीप कोयटे, सौ.सिमरन खुबाणी, प्राचार्य श्री.गोकूळ महाजन, उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन या अभियानात सक्रिय सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातील ३६ नद्या प्रदूषित झाल्याचा अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकताच दिला असून गोदावरीचे पावित्र्य आता कल्पनेत उरले आहे. काही वर्षापूर्वी स्वच्छ असलेल्या गोदावरीचे पाणी तसेच पात्रात दोन्हीही बाजुस केरकचरा, गटारे शौचालयाचे सोडण्यात आलेले पाणी यामुळे प्रदूषित तसेच अस्वच्छ झाले असून नदीपात्रात पाय टाकणे अवघड झालेले आहे. कोणतेही काम करताना ते स्वत:पासून सुरु करावे

या न्यायाने समता इंटरनॅशनल स्कूल व समता पतसंस्थेने प्रथम समता स्कूल परिसरात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छता मोहीमेत सहभाग नोंदविला व आता गोदावरी स्वच्छता मोहीमेअंतर्गत नदीपात्रात घाण–केरकचरा गोळा करून नदीपात्र स्वच्छ करण्यात आले, तसेच नदी पात्राकिनारी सुशोभिकरणही करण्यात आले. तसेच **स्वच्छतेची आस धरु, ज्ञानाचा दीप लावू, सौख्याची फुले उधळू, देशाला सुंदर बनवू, हाच आमचा निर्धार, हाच आमचा आचार** अशी शपथ घेण्यात आली. अशाप्रकारे समता परिवार यापुढेही स्वच्छता अभियानाअंतर्गत विविध उपक्रम राबविणार आहे. घाणीचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी स्वत:पासूनच सुरुवात करणे गरजेचे आहे. जोपर्यंत आपण कचरा योग्य जागी टाकरणार नाही. तोपर्यंत स्वच्छता राखली जाणार नाही यासाठी समता स्कूलमधील विद्यार्थ्यांना बालवयातच स्वच्छतेचे पाठ दिले जातात. प्रत्येक वर्गाचा क्लिनींग मॉनीटर असतो तो सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शिकवण देतो. स्वच्छतेचे महत्त्व सर्वांना समुपदेशाने पटवून दिले जाते. त्यासाठी स्कूलमध्ये विविध उपक्रम राबविले जातात.

महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांनी स्वत: हातात झाडू घेवून स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटवून दिले. हाच वारसा आपण यापुढे चालवणार आहोत. त्यासाठी तुम्ही–आम्ही सर्वांनी स्वच्छतेचा वसा घ्यायला हवा. किमान स्व:चे घर, अंगण, घराभोवतालचा परिसर, सार्वजनिक ठिकाणे शाळा, कॉलेजेस, बसस्थानक, रेल्वेस्थानक आदी ठिकाणी कचरा टाकणार नाही, घाण करणार नाही असे बंधन स्वत:वर घालून घ्यायला हवे.

या अभियानाचेवेळी विद्यार्थ्यांनी प्रबोधनपर गीते तसेच पथनाट्य सादर केले. **स्वच्छ घर, स्वच्छ परिसर, होई आरोग्याचा जागर** हा संदेश पथनाट्याद्वारा देण्यात आला. कडाक्याच्या थंडीतही विद्यार्थी मोठ्या संख्येने अभियानात सहभागी झाले होते. स्वच्छता अभियानात समता इंटरनॅशनल स्कूल मधील शिक्षकवृंद, कर्मचारी, समता पतसंस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, समता परिवाराचे संचालक व मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन समता स्कूलच्या



स्वच्छ घर – स्वच्छ परिसर होई आरोग्याचा जागर, हे पथनाट्य सादर करताना विद्यार्थी–विद्यार्थीनी व उपस्थित मान्यवर

**नूतन वर्ष २०१५**

आमचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतकांना नूतन वर्ष सुख–समृद्धी व भरभराटीचे जावो

शुभेच्छुक : **समता परिवार**

## समता पतसंस्थेच्या गांधी चौक शाखेला ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद

कोपरगांव – संस्थेच्या खातेदारांना व गावातील व्यापाऱ्यांना डिमांड ड्राफ्ट देण्याची सुविधा सुरु करण्यात आल्यानंतर ग्राहकांच्या मागणीवरुन व ग्राहकांचे आग्रहास्तव १ जानेवारी २००९ रोजी समता पतसंस्थेच्या गांधी चौक कोपरगांव शाखेचा शुभारंभ झाला. शाखा शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने व्यापारी वर्गाला सर्व आर्थिक व्यवहार अगदी कमी वेळेत करता येतात त्यामुळे ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद शाखेला लाभत आहे. शाखेने यशस्वी ७व्या वर्षात पदार्पण केले आहे.

समता पतसंस्थेचे मुख्य कार्यालय शहरातील खंदकनाला परिसरात असल्याने ग्राहकांना ठेवी ठेवण्यासाठी तसेच शाखेद्वारा उपलब्ध डिमांड ड्राफ्ट सुविधेचा लाभ मिळावा यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी समताची शाखा असावी अशी मागणी पुढे आल्याने त्यावर संचालक मंडळाद्वारा विचार–विनिमय होवून ग्राहकांची मागणी योग्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सर्वसंमतीने शाखा स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर गांधी चौकातील गांधी पुतळ्यासमोर जागा खरेदी करून संस्थेच्या मालकीची सर्व सोयी–सुविधायुक्त इमारत बांधून १ जानेवारी २००९ रोजी समता पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री.मोहनशेठ झंवर व सौ.सुमनताई झंवर यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजा होवून गांधी चौक शाखेचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या ६ वर्षात शाखेला ग्राहकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे.




गांधी चौक शाखा कर्मचारी

गांधी चौक शाखेअंतर्गत ग्राहकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यात इतर बँका व पतसंस्थांचे तुलनेत कमी व्याजदराने सोनेतारण कर्ज सुविधा (शाखेत सोनेतारण कर्ज अत्यल्प १२ टक्के व्याजदराने दिले जाते) तसेच लॉकर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून शाखेत लहानमोठे १५० लॉकर अगदी कमी वार्षिक भाडे तत्त्वावर देण्यात आले आहेत. या योजनेस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. सर्वशाखा ऑनलाईन जोडल्या गेल्याने ग्राहकांना पैसे काढणे, टाकणे, भरणा करणे, पेमेंट घेणे आदी सुविधा मिळत आहेत. तसेच वीज बील स्वीकृती सुविधेलाही ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. त्यामुळे ग्राहकांचा मुख्य कार्यालयात ये–जा करण्याचा त्रास वाचतो. ज्येष्ठ नागरिक व शहराच्या मध्यवर्ती भागातील नागरिकांना शाखेची चांगली सेवा उपलब्ध होत आहे.

गांधीचौक शाखेचे शाखाधिकारी श्री.भाऊसाहेब धाकतोडे, रोखपाल श्री.शिवाजी वाघमारे, लिपिक श्री.संजय मगर व श्री.अमेय खैरे तसेच शिपाई श्री.दत्तात्रय सांगळे या शाखा कर्मचाऱ्यांद्वारा ग्राहकांनाउत्तम व तत्पर सेवेचा लाभ होत असल्याने ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद लाभत आहे.

दि. ३१ डिसेंबर अखेर शाखेच्या ठेवी १३ कोटी ८१ लाख ५६ हजार रुपये इतक्या असून कर्जवाटप रु. १० कोटी १७ लाख ४७ हजार इतके करण्यात आले आहे.

लहान व्यापारी, व्यापारी, हातगाडीवाले, भाजीवाले, मध्यवर्गीय,उद्योजक यासारख्या सर्वसामान्यांना पतपुरवठा करुन मदतीचा हात देणाऱ्या व ग्राहकांच्या हिताचे नवनवीन उपक्रम राबविणाऱ्या समता पतसंस्थेचे जनमानसात एक आगळे वेगळे स्थान निर्माण झालेले आहे. समताची सामाजिक बांधीलकी जपणारी संस्था अशी वेगळी प्रतिमा निर्माण झाली आहे. मा.चेअरमन साहेब व नेहमीच एकदिलाने, एकमताने निर्णय घेणारे संचालक मंडळ व त्यांनी घेतलेल्या निर्णयांची चोख अंमलबजावणी करणारे कर्तव्यकठोर, कार्यक्षम शिस्तप्रिय अधिकारी व विनम्र, तत्पर सेवा देणारे कर्मचारी यांचा समताच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

## जिल्हास्तरीय ॲथलॅटीक स्पर्धेत समता स्कूलच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण पदकांची कमाई

कोपरगांव – अहमदनगर जिल्हा ॲथलॅटीक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा पातळी वरील लांब उडी व ॲथलॅटीक्स स्पर्धेत समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. १४ डिसेंबर रोजी अहमदनगर येथे एकूण ४ गटात संपन्न झालेल्या या स्पर्धेत ६ ते १२ वयोगटातील २७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक श्री. प्रशांत देशमुख, श्री.समाधान बेलेवार यांचे मार्गदर्शन लाभले.



रचित छाजेड



रोशनी ससाणे



स्वराज खिराडकर



तन्वी वाबले

पहिल्या ६ वर्षे वयोगटात इयत्ता पहिलीतील विद्यार्थी रचित छाजेड याने ५० मिटर धावण्यात प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक तर ३० मीटरमध्ये द्वितीय क्रमांकासह रजतपदक प्राप्त केले. लांबउडी मध्येही रचितने द्वितीय क्रमांकाचे

पान दोनवर

## विश्वास + सुरक्षितता = समता

### संपादकीय

# करा संकल्प बचतीचा

नववर्षाच्या उदयासोबतच गतवर्षाचा अस्त झाला आणि नव्याची चाहूल घेवून नवीन वर्ष २०१५ आले आहे. नव्या वर्षात नवे संकल्प करायला हवेत. आजच्या काळात प्रत्येक जण नववर्षाच्या प्रारंभी काहीतरी संकल्प करतो. परंतु थोड्याच दिवसांत केलेला संकल्प सोयीस्करपणे विस्मृतीत जातो. संकल्प करावा सदैव स्मरणात रहाणारा, पाळला जाणारा, मित्रांनो या नववर्षाला बचतीचा संकल्प करा. बचत करा पैशाची, बचत करा पाण्याची, बचत करा पाण्याची, बचत करा विजेची, बचत करा वेळेची, बचत करा नासाडी होणाऱ्या वा वाया जाणाऱ्या अन्नाची. या बचतीतून आपण बरेच काही साध्य करू शकतो. आणि हो प्रामुख्याने बचत करा पैशाची कारण जगण्यासाठी सर्वांना पैशाची गरज भासते. खिशात पैसे नसतील तर माणुस अपूर्ण आहे. पैसा ही विशेष शक्ती (सुपर पॉवर) कोण्या गीतकाराने म्हटले आहे की, द होल थिंग इज दॅट के भैय्या सबसे बडा रुपय्या प्रत्येक कमावत्या व्यक्तीने स्वत:च्या उत्पन्नातील ठराविक रक्कम मुदतठेवीच्या रुपाने ठेवावी. या ठेवीवर व्याजही मिळते आणि अडचणीच्या वेळी कर्जही मिळते. जेव्हा तुमच्याकडे अतिरिक्त पैसा असेल उधळपट्टी न करता तो पैसा भविष्यासाठी राखून ठेवला तर कधीच कुणापुढेही पैशासाठी हात पसरावे लागणार नाहीत. पैसे शिल्लक टाकणे, जमा करणे, म्हणजे भविष्यासाठी तरतूद करणे. बचतीची सवय लागावी या हेतूने जागतिक बँकेव्दारा १९२५ मध्ये दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस बचतदिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकांना बचतीची सवय लागावी हा त्यामागील हेतू.

लहान मुलांनाही शिक्षणासोबतच आर्थिक साक्षर करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी मुलांना बालपणापासूनच बचतीची सवय लावावी. मुलांना शाळेतून मिळणारी बक्षीसाची रक्कम, शिष्यवृत्तीची रक्कम, पाहुणे आले असता भेटीदाखल मिळालेले पैसे पिग्मी बँकेत टाकायची सवय लावावी, त्यांना बचतीचे फायदे–तोटे समजावून सांगावे पिग्मी बँक भरली की मुलांना बँकेत खाते उघडून द्यावे व त्यात वाढ करण्यासाठी प्रवृत्त करावे. मुलांना लहान वयातच इतर संस्कारासोबत बचतीचा संस्कारही देणे गरजेचे आहे. त्यामुळे भावी काळात त्यांना आर्थिक अडचणी येणार नाहीत वा कर्जबाजारी व्हावे लागणार नाही. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे थोड्या थोड्या बचतीतून भविष्यासाठीची पुंजी तर जमा होईलच परंतु नकळत झालेला बचतीचा संस्कार आयुष्यभरासाठी एक महत्त्वपूर्ण देणगीही ठरेल. काय? करणार ना मग बचतीचा संकल्प त्यासाठी कोणताही त्याग करायचा नाही वा मनाविरुद्ध निर्णयही घ्यायचा नाही बचतीच्या संकल्पनो मात्र होईल तो फायदाच!

पान १ वरून

रजतपदक प्राप्त केले. याच गटात इंटरनॅशनल स्कूल प्रि–प्रायमरी विभागातील यू.के.जी.तील मा. स्वराज खिरदकर याने ५० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रजत पदक तर ३० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांकासह कास्यपदक प्राप्त केले. ८ वर्षेवयोगटात दुसरीतील विद्यार्थीनी रोशनी ससाणे हिने लांब उडीसाठी सुवर्णपदक प्राप्त केले. १० वर्षे वयोगटात चौथीतील विद्यार्थीनी तन्वी वाबले हिने २०० मीटर व ५० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक तर लांब उडीत द्वितीय क्रमांकाचे रजतपदक प्राप्त केले. वरील चारही विजेत्या खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विजेत्या खेळाडूंचे समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष श्री.काकाजी कोयटे, व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदीप कोयटे, प्राचार्य श्री.गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ. लिसा बर्धन व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# हार्दिक अभिष्टचिंतन

## वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

| सभासदाचे नाव | जन्मतारीख | सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|---|---|
| श्री.मदनलाल मोतीलाल बागरेचा | १ जानेवारी | श्री.डागा अरुण श्रीराम | १२ जानेवारी |
| श्री.आहिरे लक्ष्मण दशरथ | १ जानेवारी | श्री.पोथीवाल नौनिहालसिंग विक्रमसिंग | १२ जानेवारी |
| श्री. आंधळकर राजाराम जगन्नाथ | १ जानेवारी | श्रीमती कोद्रे कमलबाई बबनराव | १३ जानेवारी |
| श्री.बोरावके सुरेशराव पंढरीनाथ | १ जानेवारी | श्री. कोयटे सुधीरजी दादाप्पा | १४ जानेवारी |
| सौ.जोशी सुमनबाई कांतीलाल | १ जानेवारी | सौ.हुरणे कल्याणीताई निशांत | १४ जानेवारी |
| सौ.कोठारी किरणताई रमेशचंद्र | १ जानेवारी | श्री.नरोडे सतोष ज्ञानेश्वर | १४ जानेवारी |
| श्री.साखरे काशिनाथअप्पा दशरथ | १ जानेवारी | श्री.भायभंग छगनअप्पा रंगनाथअप्पा | १५ जानेवारी |
| श्री.सोनेकर जगन्नाथ वामनराव | १ जानेवारी | श्री.शहा अभिजीत जितेंद्रभाई | १६ जानेवारी |
| सौ.बजाज शकुंतला जगन्नाथ | १ जानेवारी | श्री.केकाण शांतारामजी दत्तात्रय | १४ जानेवारी |
| श्री.कुदळे पद्माकांत शंकरराव | २ जानेवारी | श्री.बंब अनिलशेठ पोपटलाल | १९ जानेवारी |
| श्री.मुंदडा सचिन सुभाषजी | ३ जानेवारी | श्री.क्षीरसागर शाम व्यंकटेश | १९ जानेवारी |
| श्री.वरखेडे विश्वनाथ शंकर | ४ जानेवारी | सौ.क्षत्रिय सत्यभामाबाई प्रकाशजी | २० जानेवारी |
| श्री.खांबेकर अशोकराव मिमाशंकर | ४ जानेवारी | श्री.खिलोसिया चंद्रकांतजी हरकचंदजी | २० जानेवारी |
| सौ.गिरमे अश्विनी अरविंद | ५ जानेवारी | सौ.डागा गंगादेवी बद्रीनारायण | २१ जानेवारी |
| श्री.जपे शिवाजीराव ज्ञानेश्वर | ५ जानेवारी | श्री.बोरावके जनार्दन शिवरामजी | २२ जानेवारी |
| श्री.केकाण रामदासजी भिकाजी | ५ जानेवारी | श्री.जैन सचिनशेठ शिखरचंद्रशेठ | २३ जानेवारी |
| सौ.शिरोडे रुक्मीणीबाई पांडुरंग | ५ जानेवारी | श्री.जंगम बाबासाहेब बाबुराव | २४ जानेवारी |
| श्री.गोयल विजय रामगोपाल | ७ जानेवारी | श्री.शिरोडे रमेशशेठ दगडू | २७ जानेवारी |
| सौ.जैन नयना शिखरचंद्रशेठ | ८ जानेवारी | श्री.बोरावके रविंद्र रामदासजी | २७ जानेवारी |
| श्री.राठी जुगलकिशोर शंकरलाल | ८ जानेवारी | श्री.वाणी प्रभाकर भिका | २९ जानेवारी |
| श्री.केकाण प्रितेश रामदासजी | ९ जानेवारी | श्री.वायखिंडे मनिल नारायण | २९ जानेवारी |
| श्री.डोंगरे निलेश दत्तात्रय | ९ जानेवारी | सौ.बनकर रजनी विजयराव | ३० जानेवारी |
| सौ.बंब वंनाताई सुनिलशेठ | १० जानेवारी | सौ.कोठारी अमराबाई शोभाचंद | ३० जानेवारी |
| श्री.मुंदडा रामबिलासशेठ दामोदरशेठ | १० जानेवारी | सौ.नेरे प्रमिलाताई पद्माकर | ३० जानेवारी |
| श्री.कोठारी सुनिलकुमार गोकुळचंदजी | ११ जानेवारी | सौ.भडकवाडे रतनबाई चंद्रकांतशेठ | ३१ जानेवारी |
| सौ.साखरे योगिता कैलासअप्पा | ११ जानेवारी | श्री.बंब महेशकुमार मदनलालशेठ | ३१ जानेवारी |
| सौ.सातव मेघाताई भरतकुमार | ११ जानेवारी | | |

**शुभेच्छुक :**
**समता परिवार, कोपरगांव**


## बचत आजची भविष्य उद्याचे....

**७२ महिने मुदतीकरितां**

| मासिक हप्ता | मिळणारी रक्कम |
|---|---|
| ₹ १,०५०/- | ₹ १ लाख |
| ₹ २,१००/- | ₹ २ लाख |
| ₹ ३,१५०/- | ₹ ३ लाख |
| ₹ ४,२००/- | ₹ ४ लाख |
| ₹ ५,२००/- | ₹ ५ लाख |

**१३२ महिने मुदतीकरितां**

| मासिक हप्ता | मिळणारी रक्कम |
|---|---|
| ₹ ४४५/- | ₹ १ लाख |
| ₹ ८९०/- | ₹ २ लाख |
| ₹ १,३३५/- | ₹ ३ लाख |
| ₹ १,७८०/- | ₹ ४ लाख |
| ₹ २,२२५/- | ₹ ५ लाख |

थेंबे-थेंबे तळे साचे..
पण आम्ही म्हणतो



थेंबे-थेंबे भविष्य घडे...

आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी, विवाहासाठी
थेंबे-थेंबे बचत करा आणि
त्यांचे उज्वल व सुरक्षित भविष्य घडवा...

समता
नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

# वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिष्टचिंतन सर्वांना सुख लाभावे तशीच आरोग्यसंपदा


रवालिया आदिती निरव
६ जानेवारी



नेवगे ओम रविंद्र
६ जानेवारी


गुप्ता प्रथम अरुण
६ जानेवारी


निळे गार्गी ज्ञानेश्वर
७ जानेवारी


ठोळे अनिश शैलेंद्र
८ जानेवारी


शिंगी सिद्धी अभिजीत
१४ जानेवारी


पिपाडा अनुज अमीत
१६ जानेवारी


वाबळे तन्वी संदीप
१८ जानेवारी


गांधी निधी नितीन
१९ जानेवारी


जानी निसर्ग सोमनाथ
१९ जानेवारी


छाजेड रचित पराग
२० जानेवारी


ठाकूर दृष्टी कौशल
२१ जानेवारी


साखरे नंदिनी प्रशांत
२२ जानेवारी


होन प्रगती प्रशांत
२५ जानेवारी


उकिरडे अवधूत श्रीकृष्ण
२६ जानेवारी


पिपाडा पलक प्रीतम
२७ जानेवारी


बनकर ओम पंकज
२७ जानेवारी


धारणकर अर्जुन संदीप
२८ जानेवारी

गवारे राजवी प्रकाश
१ जानेवारी

लुटे श्रेयस चंदन
२८ जानेवारी

काटे सार्थक राजेंद्र
२३ जानेवारी

बंदलमोदी विजयकिर्तना श्रीनिवास
३१ जानेवारी

**शुभेच्छुक : समता परिवार,कोपरगांव**

# लक्षवेध

लक्षवेध!

आपल्याजवळ काय आहे यामुळे आपण श्रीमंत होत नाही. तुम्ही दुसऱ्यांना काय देता त्यामुळे तुम्ही श्रीमंत होता म्हणूनच सांगावेसे वाटते की, गुरु (शिक्षक, टिचर) हा जगातील श्रीमंत माणूस असावा. कारण तो ज्ञान देतो, उपदेश करतो, समुपदेशन करतो, विद्यार्थ्यांतील, शिष्यांमधील सुप्तगुण शोधून त्यांचा विकास करतो, योग्य मार्गदर्शन करतो, जगण्याची प्रेरणा देतो. चुकणाऱ्याला योग्य मार्ग दाखवतो व सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याची, माणुसकीपणाची जाणीव करुन देतो म्हणूनच गुरु (शिक्षक) सर्वात मोठा दाता आहे, समाजव्यवस्था, संस्कृती कोणतीही असो तिच्या जडणघडणीत शिक्षकांचा वाटा मोठा असतो.

हल्ली अनेक प्रकारच्या आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या असल्याने माणसाला माणसाची गरज उरलेली नाही मात्र त्यामुळेच संस्कारक्षम पिढीचा ऱ्हास होतो की काय? असा प्रश्न पडतो. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संस्कारक्षम पिढी घडविण्याची जबाबदारी प्रामुख्याने शिक्षकांवर पडते. लहान मुल ही ओल्या मातीच्या गोळ्यासारखी असतात. मातीचं मडकं बनवताना मातीचा गोळा रगडून तो फिरत्या चाकावर घालून मातीच्या गोळ्याला आतून आधार देत आणि आतून बाहेरून थापटत आकार देणारा असल्याशिवाय माती स्वप्रयत्नाने मडक्यात रुपांतरीत होवू शकत नाही. त्याचप्रमाणे लहान बालकांनाही माया, प्रेम, जिव्हाळा व संस्कार यांचा आधार मिळाला तरच ती सुसंस्कारीत बनतील आणि हे काम आई वडिलांइतकेच नव्हे त्यापेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने शिक्षकच करू शकतात. संस्काराची शिदोरी देवून आपल्या विद्यार्थ्यांना सक्षम बनवू शकतात. भावी सक्षम, सुसंस्कारीत पिढी निर्माण करण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर असते ती शिक्षक चांगल्याप्रकारे पार पाडू शकतात फक्त त्यासाठी शिकविण्याची तळमळ आत्मीयता व कष्टसाध्य प्रयत्न करण्याची शिक्षकांची तयारी हवी.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊयांना विनम्र अभिवादन**

# स्वकर्तृत्वाने देवू लढा

परस्त्रीला माता मानणाऱ्या छत्रपतींच्या राज्यात
रोज स्त्री अत्याचाराच्या घटना आहेत वाढत
विकृतीने पछाडलेल्या नरपशूंना रोखण्यासाठी
स्त्रियांनीच बदलाव्या रुढी, परंपरा, वहिवाटी,
रणरागिणी बनून करावे स्वतःचेशील रक्षण
त्यासाठी मागू नये कोणाचीही मदत वा संरक्षण
जिजाऊ, सावित्री, इंदिराजींच्या आम्ही सर्व लेकी
आत्मरक्षणार्थ सज्ज होवू, झुंज देवू एकाकी
बाप, भाऊ, पती, श्वशुर (सासरे) नको कोणाचाही आधार
स्वकर्तृत्वाने देवू लढा करू स्त्रीशक्तीचा जागर
अंधारलेल्या वाटेवरून जाण्यास नकोस भिऊ
तुझ्या-माझ्या मनी जागवू सावित्री, राजमाता जिजाऊ.
सावित्रीने केला स्त्री शिक्षणाचा जागर जिजाऊने घडविला शिवछत्रपती
अन्याय अत्याचार रोखून ठेवू सावित्री जिजाऊंची स्मृती.

# समता पतसंस्थेच्या नाशिकरोड शाखेचे ६ व्या वर्षात यशस्वी पदार्पण

कोपरगांव, – १ जानेवारी रोजी समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोपरगांवच्या नाशिकरोड शाखेने आपल्या कामकाजाची ५ वर्षेपूर्ण करुन ६व्या वर्षात पदार्पण केले आहे. नाशिक शहरातील शेकडो विविध खाजगी, सरकारी, निमसरकारी बँका, विविध नामांकीत पतसंस्था, चिटफंड व इतर वित्तीय संस्थांच्या स्पर्धेत नाशिकरोड शाखेने आपला पाया मजबूत केला असून ५ वर्षापूर्वी ५५ लाख ५२ हजार रुपये ठेवी असलेल्या शाखेतील ठेवींचा आकडा आज ७ कोटींवर पोचला आहे. शाखेला नाशिककरांचा चांगला प्रतिसाद मिळत असून विश्वास आणि सुरक्षितता ग्राहकांना देण्यात शाखा यशस्वी झाल्याचा पुरावा म्हणजे दरवर्षी ठेवींमध्ये होणारी भरघोस वाढ. समताने आपल्या २९ वर्षाच्या वाटचालीत जेथे जेथे विस्तार केला तेथे तेथे चांगला प्रतिसाद लाभत आहे. शाखेच्या यशस्वी वाटचालीत काकासाहेबांसारखे खंबीर, पारदर्शी व अनुभवी नेतृत्व, ग्राहकहिताचे सर्व संमतीने घेतले जाणारे निर्णय व त्यास एकमताने पाठींबा देणारे संचालक मंडळ यांचा मोलाचा वाटा आहे.

गरजू व अडचणीत सापडलेल्यांना मदतीचा हात देण्यासाठी सदैव तत्पर असलेल्या समता पतसंस्थेने नाशिक येथील अडचणीत सापडलेल्या संस्थेचे पुनरुज्जीवन करुन अनेकांना जगण्यासाठी हात दिला तसेच तेथील कर्मचारी व अल्पबचत प्रतिनिधींना पुनश्च लोकांचा विश्वास आत्मविश्वास मिळवून दिला. स्वत:च्या फायद्याबरोबरच गरजूंना जगण्याचे बळ देण्याचे काम समता करीत आहे. व्यापारी वर्गातून आलेले येणे–देणे व्यवहाराचे सखोल ज्ञान असलेले संचालक मंडळ, मा.चेअरमनसाहेबांचे कार्याभिमुख व अनुभवी नेतृत्व, कार्यक्षम, शिस्तप्रिय अधिकारी आणि त्यांचे मार्गदर्शनाखाली काम करणारे सदैव तत्पर व विनम्र सेवा देणारे पदाधिकारी व कर्मचारी यांचा समताच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

संस्थेतील शिस्तप्रिय व सहकार्यपूर्ण सेवा तसेच ग्राहकांना नेहमी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या नवनवीन सेवा–सुविधा, नेहमी राबविले जाणारे विविध उपक्रम यामुळे ग्राहक समाधानी असून शाखा प्रगतीपथावर आहे. नाशिकरोड शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री.आनंद निकुंभ व सहकारी कर्मचारी यांचेकडून ग्राहकांना मिळणाऱ्या तत्पर व विनम्र सेवा–सहकार्यामुळे शाखेने ३१ डिसेंबर २०१४ अखेर ७ कोटी ७ लाख रुपये ठेवींचा पल्ला ओलांडला असून ४ कोटी ८३ लाख ८७ हजार रुपये कर्ज वाटप केलेले आहे. हे ठेवींचे प्रमाणात ११.९७ टक्के इतकी वाढ झाली. आहे. विश्वास+सुरक्षितता ग्राहकांना देण्यात नाशिकरोड समता शाखा यशस्वी झाली आहे.

शाखेच्या यशस्वी वाटचालीत जनमंगल ठेव प्रतिनिधी सर्वश्री रमेश जाधव, संजय आंबेकर, सौ.पूजा नगरकर, संतोष पुरोहित, निलेश हिंगमीरे, महेश गोसावी, कैलास राजमाने, बद्रीनाथ झरेकर, अशोक क्षीरसागर, कैलास डबे, शैलेश लांडगे, अशोक गर्जे व विनोद नामदे त्याचप्रमाणे रिकरिंग ठेव प्रतिनिधी श्रीमती माधवी होनराव यांचा मोठा वाटा आहे. सर्व प्रतिनिधी शाखेचे आर्थिक बळ वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असल्याने ठेवींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

# फुटबॉल स्पर्धेत समता इंटरनॅशनलचे खेळाडू विजयी

कोपरगांव – कोपरगांव लायन्स क्लबतर्फे आयोजित इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांकासह चषक व १ हजार रुपये असा पुरस्कार प्राप्त केला. तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून मिळणाऱ्या योग्य प्रशिक्षणामुळे समता स्कूलच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड होत आहे.

संजीवनी अ‍ॅकॅडमी येथे आयोजित १२ वर्षेवयोगटाखालील स्पर्धेत कोपरगांव तालुक्यातील १४ संघांचा सहभाग होता. साखळी स्पर्धेअंतर्गत झालेल्या मॅचमध्ये समता स्कूलच्या खेळाडूंनी प्रथम आत्मा मालीक स्कूलच्या संघास १–० असे पराभूत केले. समता स्कूलच्या संघाचे नेतृत्व अक्षय ठोळे यांनी केले. दुसऱ्या साखळी सामन्यात समताच्या खेळाडूंनी ओम गुरुदेव स्कूलचा ३–१ ने पराभव केला. तर तिसऱ्या स्पर्धेत आत्मा मालीक स्कूलचा १–० असा पराभव करुन विजय प्राप्त केला. समता स्कूलच्या संघातील खेळाडू विशाल मते, कुलदीप कोयटे, सिद्धांत जोशी, रुजुला रोहमारे, कृतिका गोंदकर, प्रतिक्षा वाणी, रिया बोत्रा, उर्वी पितांबरे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात समता स्कूलने संजीवनी अ‍ॅकॅडमी संघावर ४–१ अशी मात करून विजय




समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, सौ.सुहासीनीताई कोयटे, व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदीप कोयटे, एक्झीक्युटीव्ह कमीटी मेंबर सौ.सिमरन खुबाणी,क्रिडा शिक्षक किशोर कांबळे व प्रशांत देशमुख, प्राचार्य श्री.गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ. लिसा बर्धन व विद्यार्थी

प्राप्त केला. संघाच्या विजयात अंश खुबाणी, तिर्थ ठोळे, सम्राट गवारे, रितेश घुमरे, सिद्धी गवळी, ओम साखरे, अनिल ठोळे यांचा महत्त्वाचा वाटा होता.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे या फुटबॉल स्पर्धेत मुला–मुलींचे एकत्रीत संघाचा सहभाग होता. समता स्कूलच्या संघात ६ मुलींचा सहभाग होता. विजेत्या संघाचे समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये गुलाबपुष्प वर्षाव व ढोल–ताशांच्या गजरात फटाक्यांच्या धूमधडाक्यात स्वागत करण्यात आले. समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, सौ.सुहासीनीताई कोयटे, व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदीप कोयटे, एक्झीक्युटीव्ह कमीटी मेंबर सौ.सिमरन खुबाणी यांचे हस्ते विजेत्या संघाचा सत्कार करण्यात आला. तसेच क्रिडा शिक्षक किशोर कांबळे व प्रशांत देशमुख यांचाही सत्कार करण्यात आला. विजेत्या संघाचे प्राचार्य श्री.गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ. लिसा बर्धन शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



नृत्यस्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसोबत डान्स प्रशिक्षक श्री. विनोद वाघमारे व विद्यार्थी प्रणाली पवार, राज बावीस्कर, आर्यन ससाणे, आदित्य उंबरकर

# जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये समता डान्स अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश

कोपरगांव – अहमदनगर जिल्हा स्पोर्ट डान्स असोसिएशन आयोजीत शहरी व ग्रामीण नृत्य स्पर्धेत समता डान्स अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यामधून एकूण पंधरा संघ या नृत्य स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. समता डान्स अ‍ॅकॅडमी कोपरगांव हि डान्स अ‍ॅकॅडमी दोन वर्षांपासून कोपरगांव येथे चालू आहे. केवळ समता इंटरनॅशनल स्कूलमधीलच नव्हेत तर कोपरगांव शहरातील वेगवेगळ्या शाळेमधील मुले या अ‍ॅकॅडमीमध्ये आज वेगवेगळ्या प्रकारचे डान्स शिकत आहेत.

वरील स्पर्धेमध्ये दहा वर्षेवयोगटात मुलींमध्ये मिस प्रणाली पवार हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर याच गटामध्ये मुलांमध्ये मास्टर राज बावीस्कर याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. बारा वर्षाखालील वयोगटामध्ये समता डान्स अ‍ॅकॅडमीचा विद्यार्थी मास्टर आर्यन ससाणे याने प्रथम क्रमांक व मास्टर आदित्य उंबरकर याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

समता इंटरनॅशनल स्कूलचे डान्स टिचर व समता डान्स अ‍ॅकॅडमीचे मुख्य डान्स प्रशिक्षक श्री.विनोद वाघमारे यांना बेस्ट कोरिओग्राफर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले, तसेच त्यांची श्रीरामपूर तालुका स्पोर्ट डान्स असोसिएशनचे अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन समता इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदिप कोयटे, प्राचार्य गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ. लिसा बर्धन व सर्व शिक्षक वर्गाने केले.

'समता वार्ता' हे पत्र प्रकाशक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे ''समता चारीटेबल ट्रस्ट'' कोपरगाव यांचेसाठी मुद्रक किरण चंद्रकांत माळी यांनी शिवम् ग्राफिक, निवास कॉर्नर, कोपरगाव जि अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून समता पतसंस्था कोपरगाव ता. कोपरगाव जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रशिद्ध केले संपादक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे मो. ९८२२४३५२५५/९३७१३३३५५५, सहसंपादक: बेबी मनोहर मराठे, ऑफिस फोन ०२४२३ २२५५५७/८
ई–मेल : samatavarta@gmail.com (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतिलच असे नाही. वादविवाद कोपरगाव न्यायकक्षेत) RNI NO. MAHMAR43417 /13-TC